2020-21

40/59

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308


# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## February - 2021

ISSUE No - CCLXXI (271)






**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head,Deptt.of Economics,
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

| | | |
|---|---|---|
| | विश्लेषण प्रा. एन. जी. सोनुले | |
| 22 | विदर्भ जलसिंचन क्षमतेचे भौगोलिक अध्ययन डॉ. सुषमा ल. दामोदरे, | 115 |
| 23 | आदिवासी साहित्याच्या प्रेरणा आणि सद्यस्थिती **प्रा. डॉ. अविनाश मेश्राम** | 122 |
| 24 | मराठी कथेतील वास्तवदर्शी भावविश्व **डॉ. हिराजी बनपूरकर** | 128 |
| 25 | महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय : एक अध्ययन प्रा. सचिन गणपतराव कर्णेवार | 132 |
| 26 | ब्रज का भक्ति संगीत प्रा. डॉ. श्वेता दीपक वेगड | 137 |
| 27 | शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय चोपराम लक्ष्मण गडपायले / डॉ.अमोल मांडेकर | 142 |
| 28 | बाबा आमटेंच्या 'ज्वाला आणि फुले' मधील जीवन दर्शन डॉ. वैजयंती पेशवे | 147 |
| 29 | आदिवासींचे शिक्षण प्रा. डॉ. लोकचंद बी. जाधव | 152 |
| 30 | ऋषि–मुनियों की दयालुता एवं शाप की प्रवृत्ति कालिदास की रचनाओं सन्दर्भ में डॉ.अर्चना पाल | 155 |
| 31 | महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे ऐतिहासीक योगदान डॉ. मनिष कान्हा चव्हाण | 160 |
| 32 | Kamala Markandaya's fiction and her Diasporic perspective – The Tales of Cultural Clash and process of Being and Becoming **Dr.Aachal Mundafale** | 164 |
| 33 | Evils of Racism in Gugi wa Thiong'o's 'The River Between' **Sapnil Shankarrao Kalpande** | 167 |
| 34 | पंचायत राज व्यवस्थेच्या विकासात आर. आर. पाटील यांची भूमिका **प्रा. साखरे दत्तात्रय यशवंत** | 169 |
| 35 | कार्लमार्क्स यांचे तत्त्वज्ञान व साहित्य – एक सिंहावलोकन **प्रा.पुरुषोत्तम दि. माळोदे** | 172 |
| 36 | पेशवे काळातील शिक्षा डॉ.विजय रामदास तिरपुडे | 177 |
| 37 | Digital India: Opportnites And Challenges **Dr.Subhash Patekar,** | 179 |
| 38 | महदंबा — आद्य मराठी कवयित्री प्रा. डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे | 182 |
| 39 | भारतातील दारिद्र्याचे कारणे व उपाययोजना प्रा. रविन्द्र सदाशिव बर्वे | 185 |
| 40 | उपभोगता अधिनियम 2019 एक अध्ययन डॉ. संदिप भिमराव डोंगरे | 188 |
| 41 | उपयोजित मराठीची क्षेत्रे आणि विविध कला–कौशल्य,संधी डॉ.चंद्रशेखर सुधाकर देवघरें | 195 |
| 42 | Women concerns in Clifton's Poetry **Mahendra Telgote,** | 197 |




Late. N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Off.Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor - ((SJIF) –7.675, Issue NO, 271(CCLXXI) B
ISSN : 2278-9308
February, 2021

# उपयोजित मराठीची क्षेत्रे आणि विविध कला–कौशल्य,संधी

डॉ.चंद्रशेखर सुधाकर देवघरें
स्व.निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लाखनी, ता.लाखनी, जि.भंडारा.

प्रस्तावना :–

भाषा हे संवादाचे साधन आहे. मानवी जीवन हे भाषेच्या माध्यमातुन प्रवाही आणि गतिमान होत असते. विचार व्यक्त करणे, संवेदना वा जाणिवा होणे, प्रतिसाद देणे हयासाठी भाषा ही महत्त्वाची आहे. भाषेच्या मूल्य चौकटीतुन मानवी आंतरक्रिया घडत असते.

भाषा ही लोकजीवनाची, लोकमूल्याची, लोकसंस्कृतीची, विभिन्न प्रेरणेची जननी आहे. भाषा ही कधीच संपू शकत नाही. कारण मानवी जीवनाचा प्रमुख घटक हि भाषाच आहे. विशेषत: मानवी जन्मापासून त्याला सर्वप्रथम शब्द, शब्दांचे उच्चारण आणि त्यातील अर्थबोध होऊन भाषेची ओळख होऊ लागते. भाषेतूनच आपले जीवन जगतो. भाव–भावनांचे आदान–प्रदान हे भाषेच्या माध्यमातूनच करीत असतो. हयाला आपण संवाद म्हणतो.

भाषण, संभाषण, बोलण, सांगणे, ऐकणे, लिहिणे, वाचणे, ऐवढेच नसून संवाद म्हणजे मानवी मनाचे एक वर्तनच असते. त्यात वर्तनाचे हेतू असतात. परंतु ते हेतूही स्थिर राहीलच असे नाही. तर त्यातही परिवर्तन हे घडून येत असते.

आपल्या मातृभाषेचा वा राजभाषेचा प्रचार व प्रसार हा दैनंदीन जीवनाची मूलभूत गरज बनली आहे. आजच्या विभिन्न प्रसार माध्यमातुन आपल्या मराठी भाषेचे महत्त्व अनन्य साधारण न राहता ते एका विशिष्ट उच्च पातळीवर गेल्याचेही आपणांस दिसून येते. मराठीची व्यव्हार क्षेत्रे हि व्यापक अशीच आहे.

मराठी भाषेची कौशल्य पाहता, लेखन कौशल्य व संभाषण कौशल्य हे दोन प्रकार पहावयास मिळतात. जी कॅरीअरच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

**लेखन कौशल्य क्षेत्र व संधी :–**

लेखन हे प्रगतीकरणाचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. लेखन कौशल्याचा विचार करतांना त्यात प्रामुख्याने, बातमी लेखन, जाहीरातीचे लेखन, नियत कालीकातील लेखन, संपादन करणे, मालिकांसाठी संवाद लेखन, कथा, पटकथा लेखन, असे लेखनाचे अनेक क्षेत्र आहे. वृत्तपत्रे, मासिक, नियतकालिके, हयांचा फार मोठा विस्तार होतांना दिसतो. हयामध्ये भाषिक कौशल्य प्राप्त अनेकांना संधी उपलब्ध होत असतात. बातमी लेखन, अग्रलेख, संपादन वा संपादकीय, क्रीडावृत्तांत, श्री पेज अशा प्रकारचे लेखनांचे अनेक प्रकार त्याचबरोबर माहितीपरलेख, प्रासंगिकलेख, ज्ञानात्मकलेख, सर्जनशील लेख, जीहिरातलेखन, अशा विभिन्न क्षेत्रात संधी उपलब्ध असून भाषिक कौशल्यांचा सराव असणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता असते. चौसष्ट कलेसोबत पासष्टीवी कला ही जाहीरात क्षेत्रातील कलाकौशल्य आहे. ज्यात अनेकांना विशेषत: संधी उपलब्ध असते.

आजच्या आधुनिक प्रसार माध्यमातुन जसे की, चित्रपट, मालिका, टी.व्ही शो हयांसाठी सर्जनशील लेखनांची आवश्यकता असते. याशिवाय ग्रंथपरिक्षण, नाटयसमीक्षा, चित्रपटसमीक्षा, भाषांतरीत लेखन, साहित्य समीक्षा, नभो नाटय लेखन, श्रुतिका लेखन, इ. भाषा विषयाच्या उपयोजनाचे अनेक क्षेत्र संधी म्हणून उपलब्ध व उपयुक्त अशीच आहेत.

**संवाद कौशल्य क्षेत्र व संधी :–**

'संवाद' हे मानवी मनाला जवळ करणारे व आत्मप्रकटीकरणाचे प्रभावी माध्यम आहे. संवादाव्दारे भाषेचा व्यवहार हा होत असतो. 'भाषा' बोलणे हे संवाद कौशल्य होय. अर्थात बोलणे ही देखील एक कलाच आहे. उत्तम वक्तृत्वाने उत्कृष्ठ वक्ता आपले विचार, ज्ञान, भाव–भावना, विभिन्न माहितीचे प्रकटीकरण प्रभावी व परिणामकारतेने करता येते.

आजच्या आधुनिक काळात सुत्रसंचालन करणे, मुलाखत घेणे, उद्घोषक, वृत्तनिवेदन करणे, जाहिरात संवाद, पार्श्वसंवाद, महाचर्चा घडविणे, बातमी पत्राचे उत्कृष्ठ वाचन करणे, मनोरंजनात्मक हास्य असे अनेक विविध भाषिक संवाद कौशल्यावर आधारीत संधी उपलब्ध असतात. अर्थात हे सर्व संवाद कौशल्य असून मानवी जीवनाला व मानवी मनाला भाषेच्या लोकव्यवहारातून गतीमान करीत असतात. 'साहित्य' भाषेला सामाजिक व वैचारिक अधिष्ठान देते तर व्यवहारिक भाषेला जीवंतपणा व रसरसीतपणा बहाल करते. प्रत्यक्ष जीवनव्यवहारात भाषा उतरविणे जीवनातील विविध क्षेत्रे जिज्ञासूवृत्तीने समजून घेऊन भाषेच्या अभ्यासकांनी भाषेचे सुयोग्य उपयोजन करून अनेक क्षेत्रातील संधी मिळविण्यासाठी

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

कार्यरत असायला पाहिजे. तेव्हा मराठी भाषेच्या हया कला कौशल्याला मराठी साहित्याच्या अध्यापन व अध्ययनाला सखोल अभ्यासाला एक नवीन दिशा नक्कीच प्राप्त होईल कि जेणे करून येणारा भविष्यकाळही सुखमय जाईल.

निष्कर्ष :-

उपयोजित मराठीची विविध क्षेत्रे असून त्यात विभिन्न कला, कौशल्यासह संधी देखील या लेखातुन कशाप्रकारे उपलब्ध आहे. हेच आपणांस पूर्णपणे सांगता येईल.

संदर्भ ग्रंथ :-

१). 'प्रसार माध्यमासाठी लेखन कौशल्य'–संपादक य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.
२).'व्यवहारिक मराठी'– संपादन डॉ.स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ.१९९४.
३). 'जागतिकीकरण–मराठी भाषा आव्हान आणि उपाय'.–संपादन डॉ.जयद्रथ जाधव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२०११
४). 'व्यवहारिक मराठी'. – संपादन ल. रा. नासिराबादकर फडके प्रकाशन, कोल्हापूर.